# नागरिक अधिकार

संपादक : सुभाष बसवेकर

वर्ष २ ले. अंक ६ वा. नवी मुंबई दिनांक १ ते ३१डिसेंबर २०१२ पाने १६ किंमत २० रूपये



## अन्यायाविरोधात लढण्याचे प्रभावी हत्यार !

# जनहित याचिका कशी दाखल करावी ?



## मेरे सपनों को जानने का हक रे !



IS 15298

CM/L-3793581
Part-2

## ट्रेडमार्क कडे द्या जरा आवधान

## फसव्या उत्पादकांपासून सावधान !



## RTI कायदा धाब्यावर ठेवून बसले, खूशाल थंड

## ४५९ सरकारी अधिकाऱ्यांना ४४ लाख रुपये दंड

माहिती अधिकार कायद्याचा प्रसार करणारे झुंजार मासिक !

मासिक
# नागरिक अधिकार

सुभाष बसवेकर
● संपादक ●
गणेश काजळे-पाटील
●कार्यकारी संपादक●

संपादक मंडळ /प्रतिनिधी

किरण मांजरेकर (मुंबई)
प्रमोद लक्ष्मण कदम(मुंबई)
देविदास चौथमल (औरंगाबाद)
भगवान वाहूळे (पूणे)
राजेश ठाकूर (नागपूर)
राजेश बने (रायगड)
प्रीतम यादव (सातारा)
डॉ.नृसिंह भस्मे (कोल्हापूर)
अजित कोठारी (जालना)
स.अहमद स.अली अन्सारी(परभणी)

अंक दर महिन्याच्या दहा तारखेला प्रकाशित होतो. अंकात प्रकाशीत झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाहीसर्व वादविवाद पनवेल नवी मुंबई न्यायालय कक्षेत.

पत्ता : नागरिक अधिकार
प्लॉट नं. ई-९६ सेक्टर-१२
खारघर, नवी मुंबई ४१०२१०
मो.९२२३५१६९२०
E- mail :
mediamansubhash@gmail.com
: web site :
rtimahasangh.weebly.com

संपादकीय...........

## हमने कलम उठाई है,तो इतिहास लिखेंगे !

या देशाचे अधिकृत नाव काय ? भारत,हिन्दूस्थान की इंडिया?असा प्रश्न पंतप्रधान कार्यालयाला माहितीच्या अधिकारात एक विद्यार्थीनीने विचारला आहे. या देशाचे दूर्दैव हे की या देशाचा पंतप्रधान या देशाचे नाव काय आहे.हे सांगू शकत नाही. पंतप्रधान कार्यालयाने हा अर्ज भारतीय अभिलेख कार्यालयाला पाठवून या प्रश्नाचे उत्तर देण्याची जबाबदारी टाळली आहे. आता म्हणे अभिलेख विभागाचे अधिकारी कागदपत्रे शोधून या देशाचे नेमके काय नाव आहे.हे शोधण्यात गुंतले आहेत.या देशाला धड एक अधिकृत नाव नाही.आणि या देशाचा पंतप्रधान छातीठोकपणे या देशाचे नाव सांगू शकत नाही.त्या देशाचे भवितव्य अंधाराकडेच वाटचाल करीत राहणार हे दिसत आहे. वाचक म्हणतील नावात काय आहे ? परतु नावा पासूनच ओळख निर्माण होते.जेव्हा देशाला स्वत:ची ओळख नसते तेव्हा स्व:ताचे आत्मभानही जाणवत नाही.आणि आत्मभान जाणवत नाही तेव्हा त्या देशाला कसलेच भवितव्य असत नाही.या देशाचा आत्मा जर अजूनही कोठेतरी गुलामीत खीतपत पडला असेल तर या गुलाम मानसिकतेच्या शृंखला तटातटा तोडून आमच्या व्यवस्थेची विजूगिषू मांडणी पुन्हा करावी लागेल आणि देशाला वैभवाच्या शिखरावर नेण्यासाठी व्यवस्था परिवर्तनाची लढाई अधिक परिणामकारकपणे लढावी लागेल.गेल्या ६० वर्षातील झालेल्या चूका शोधून त्यावर परिणाम कारक उपाय शोधावे लागतील प्रसंगीदेशातील १२० कोटी च्या कल्याणसाठी नव्या व्यवस्थेसाठी सर्व मांडणी नव्याने करावी लागेल. कवियत्री पुनम शर्माच्या शब्दात सांगायचे तर....

रक्त की लालीमा से देश का स्वाभिमान लिखेंगे
समाज और जनता की दबाई आवाज लिखेंगे
ह्रदय से हर मानव का सम्मान लिखेंगे
सच्चे शब्दोमें सच का अहसास लिखेंगे
हमने कलम उठाई है,तो इतिहास लिखेंगे !

# जनहित याचिका कशी दाखल करावी ?



जन हित अधिकार न्यायव्यवस्था (पब्लिक इंटरेट लिटिगेशन पीआयएल)) म्हणजे सोप्या शब्दात सांगायचे तर जनतेचा अधिकारांचा याचिका करण्यासाठी कोर्टात दाखल केलेला दावा होय.आमच्या न्यायव्यवस्थेतील हे एक फार महत्वाचे नागरिक अधिकाराच हत्यार आहे.आमच्या संविधानाने व्यापक लोकहिताला घटनात्मक सरंक्षण दिलेले आहे.जेव्हा या लोकहिताचा संकोच होत आहे हे दिसते तेव्हा तेव्हा प्रभावीत व पीडीत लोकांच्या वतीने कोणताही व्यक्ती किंवा गट तक्रारीचे निवारण करण्यासाठी जनहितयाचिका कोर्टात दाखल करू शकतो

## संक्षिप्त कायदा

जन हित अधिकार न्यायव्यवस्था (पब्लिक इंटरेट लिटिगेशन पीआयएल)) म्हणजे सोप्या शब्दात सांगायचे तर जनतेचा अधिकारांचा याचिका करण्यासाठी कोर्टात दाखल केलेला दावा होय.आमच्या न्यायव्यवस्थेतील हे एक फार महत्वाचे नागरिक अधिकाराच हत्यार आहे.आमच्या संविधानाने व्यापक लोकहिताला घटनात्मक सरंक्षण दिलेले आहे.जेव्हा या लोकहिताचा संकोच होत आहे हे दिसते तेव्हा तेव्हा प्रभावीत व पीडीत लोकांच्या वतीने कोणताही व्यक्ती किंवा गट तक्रारीचे निवारण करण्यासाठी जनहितयाचिका कोर्टात दाखल करू शकतो.परतुं त्या प्रकरणात सार्वजनिक हिताचा समावेश असायला हवा.न्यायव्यवस्थेत्ला जर वाटले की जनहिताचा संकोच होत आहे तर एक साध्या पत्राचा,वर्तमानपत्रातील बातमीचा आधार घेवूनही न्याय व्यवस्था जनहिताच्या मुद्यावर या कायद्याने न्यायनिवडा प्रक्रिया सुरू करू शकते.

माजी मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांना चित्रपट दिग्दर्शक सुभाष घई यांच्या संस्थेला चित्रनगरी गोरेगांव येथे २० एकर जागा दिली होती.ही जागा देताना नियम व कायदे डावलले गेले असल्याचे लातूर एक सामान्य शेतकऱ्याच्या लक्षात आले त्यांनी कोर्टात जनहित याचिका केली. जनहित याचिकेचा निकाल आला आणि सुभाष घई यांनी ही जागा सोडावी असे आदेश आले.जनहित याचिका प्रक्रियेने एक सामान्य शेतकऱ्यांला ही शक्ती मिळाली.जनहित याचिकेच्या यशाची अशी अनेक उदाहरणे आहेत.

शिकण्याची तीव्र इच्छा असलेल्या विद्यार्थ्याला शिकवावं लागत नाही ,तो स्वत:हून शिकवतो.

# जनहित याचिका कशी दाखल करावी ?

## कायद्याचा तपशील

जनहित न्यायव्यवस्थेचा दावा तेव्हाच करता येतो जेव्हा मोठया प्रमाणावर "सार्वजनिक हित " प्रभावित होत असेल राज्याच्या कारवाईमुळे जर फक्त एकच व्यक्ती प्रभावित होत असल्यास जनहित ;याचिका न्यावव्यवस्था ही लागू होत नाही. किंवा अशी याचिका फेटाळली जावू शकते.

जनहिताधिकार न्यायव्यवस्था लागू होत असलेली काही क्षेत्रे खाली देण्यात येत आहेत.ही फक्त उदाहरणे आहेत.यापेक्षा वेगळे अनेक विषय असू शकतात.

१.जेथे एखाद्या कारखान्यामुळे / उद्योगामुळे वायु प्रदुषण होत असेल आणि भोवतालचे लोक प्रभावित होत असतील तर

२.जेथे एखाद्या क्षेत्रात / रस्त्यांवर दिवे नाहीत व अंधाराचा वाटसरूंना त्रास होतो.

३.जेथे एखाद्या बॅक्वेट हॉल मधील रात्री होत असलेल्य मोठया आवजामुळे ध्वनि प्रदुषण होते.

४.जेथे एखाद्यी बांधकाम कंपनी झाडे तोडून टाकीत आहे.आणि पर्यावरणाचे प्रदुषण होत आहे.

५.जेथे गरीब लोक सरकारनी उच्च कर लावल्याने प्रभावित होत आहेत.

६.तुरंगाधिकारी / पोलीस अधिकारी यांना तुरूंगाच्य पुननिर्माणासाठी जसे कैद्यांचे वर्गीकरण, खटला चालविण्यात विलंब, कोर्टापुढे चालू खटल्यांच्या रिमांडच्या तारखा यांबाबत निर्देश देणे

७. बाल श्रम अणि वेठबिगार निर्मूलन करण्यासाठी.

८.जेथे लैंगिक उत्पीडनामुळे कामकाजी स्त्रियांच्या अधिकारांचे हनन होत असेल.

९.उच्च पदस्थ राजकारणी लोकांच्या भ्रष्टाचारावर आणि अपरांधावर नियंत्रण ठेवण्यासाठी

१०.रस्ते,सीवर (गटारे) अन्य नागरी सुविधा इत्यांदीच्या चांगल्या अनुपालनासाठी

११.वाहतूकीच्या समस्या कमी करण्यासाठी,प्रवाशांना त्रासदायक ठरणारे रस्तावरील मोठ-मोठे जाहिरातीचे होर्डिंग काढून टाकण्यासाठी

अशा असंख्या सामाजिक हिताच्या कामासाठी जनहितयाचिका करता येतात.

कोणत्या कलमाखाली तक्रार दाखल करावी

भारतीय संविधानाच्या अनुच्छेद ३२ आणि अनुच्छेद २२६ अन्वये जनहित याचिका करण्याची तरतूद करण्यात आली आहे.

कोणी / कोठे / कोणाकडे तक्रार करावी

कोणीही ही जनहिताची काळजी वाहणारी व्यक्ती (पब्लिक इंटरेस्ट लिटिगेशन) ज्यांच्या अधिकारांचे हनन झाले आहे अशा लोकांच्या एखाद्या गटांना न्याय मिळवून देण्यासाठी दावा दाखल करून शकते.

जी व्यक्ती लिटीगेशन फाईल करीत असेल तिचा पब्लिक इंटरेस्ट लिटिगेशनमध्ये काही स्वार्थ असेलच असे काही आवश्यक नाही.

तथापि संबधित राज्य प्राधिकरणाला प्रतिवादी म्हणून एक पक्ष मानून पब्लिक इंटरेस्ट लिटिगेशनमध्ये खासगी पक्ष समाविष्ट करण्यात येवू शकतो.

## खटला कसा दाखल करावा

एखाद्या न्यायादेश फाइल करतात त्या प्रमाणे जनहित अधिकार याचिका (पब्लिक इंटरेस्ट लिटीगेशन)फाइल करण्यात येते

जर जनहिताधिकार याचिका हाय कोर्टात दाखल करण्यात आली असेत तर याचिकेच्या दोन प्रति फाइल कराव्यात तसेच यचिकेची एक ऍडव्हान्स प्रत प्रत्येक प्रतिवाद्यास देण्यात यावी.उदा विरूद्ध पक्ष अणि सेवेचा हा पुरावा याचिकेसह संलग्न करण्यात यावा

जर सुप्रिम कोर्टात जनाहिताधिकार याचिका दाखल करण्यात आली असेल तर याचिकेचे ४प्लस जितके विरोधी पक्ष असतील तितक्या अधिक उदा विरूद्ध पक्ष जर एक असेल तर ४ अधिक १ (उदा ५) संच फाईल करायला हवेत.नोटीस जारी झाल्यानंतर विरूद्ध पक्षाला प्रत देण्यात येते.

दर प्रतिवादी रूपये १०० इतकी कोर्ट फी आहे.उदा विरूद्ध पक्षांची प्रत्येक संख्या इतकी फी याचिकेसह भरावी लागते.तथापि एखादे पत्र किंवा बातमी यांच्या विचार पीएलआय म्हणून केला तर कोर्टाची फी भरण्याची गरज पडत नाही.जनहित अधिकार याचिकेची प्रक्रिया इतर खटल्याप्रमाणेच चालविण्यात येते

तथापि प्रक्रियेच्या दरम्यान न्यायाधिशांस वाटल्यास प्रदुषण होणे, झाडे तोडणे, सीवर गटार समस्या इत्यादि सारख्या आरोपांची चौकशी करण्यासाठी एक कमिशनर नियुक्त करू शकतात.

विरूद्ध पक्षाकडून उत्तर आणि याचिका कर्त्यांकडून प्रतिउत्तर फाइल केल्यानंतर मग न्यायधिश आपला निर्णय देतात.

कोर्ट सार्वजनिक हिताकारणाने कोणताही अंतिम निर्णय देण्याआधी तात्पूरता परिहाराचा आदेश देवू शकतात.

## पुढे काय ?

हाय कोर्टाच्या निर्णयाविरोधात सुप्रीम कोर्टात अपील करता येते

तात्कालीन उपाय

राज्याच्या कायदा सेवा प्राधिकरणाच्या चेअरमन ला पत्र किंवा संदेश पाठवून वस्तूस्थिती कळवून पुढील कारवाई

## आरटीआय कार्यकर्ते,सामाजिक कार्यकर्ते व जागरूक नागरिकांना एक आवाहन

# नागरिक अधिकार

हा अंक आपणास आवडला का ? प्रत्येक महिन्याला नवनवीन फ्रेश आणि उत्तमोत्तम माहिती आपल्याला घरपोच यावी असे मनापासून वाटते ना ?तर मग आपण विस्वासाने बिनधास्तपणे नागरिक अधिकार परिवाराचे सदस्य बना.

*आपण या अंकाचे वर्गणीदार व्हा !*

**वार्षिक : २४०रूपये. पंचवार्षिक : १००० रूपये आजीवन :५,०००रूपये**

आपले डी.डी./ चेक **नागरिक अधिकार** या नावाने काढून संपादक नागरिक अधिकार प्लॉट नं.ई.९६,सेक्टर -१२ खारघर, नवी मुंबई ४१०२१० या पत्यावर रजिस्टर पोस्टाने पाठवावेत किंवा तुमच्या शहरातील जवळच्या स्टेट बँक ऑफ इंडिया च्या कोणत्याही शाखेतून **32619447406** स्वराज बहुउद्देशिय संस्था,खारघर नवी मुंबई या नावाने पाठवावेत..बँकेत पैसे भरताच आपले नाव व पत्ता ९२२३५१६९२० या नंबरवर फोन करून कळवावा.आपणास आपल्या पत्यावर नियमित अंक पाठवला जाईल.

---

## आरटीआय कार्यकर्ते,सामाजिक कार्यकर्ते व जागरूक नागरिकांना सभासद होण्यासाठी आवाहन

जनजागृती ! संरक्षण ! ! संघर्ष ! ! !

# माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ, महाराष्ट्र

आरटीआय कार्यकर्त्यांची राज्यव्यापी एकजूट !

महाराष्ट्रातील माहिती अधिकार कार्यकर्ते,सामाजिक व राजकीय क्षेत्रातील कार्यकर्ते ,पत्रकार जागरूक नागरिक यांच्याकडून - शासकीय कार्यालयातील भ्रष्टाचार व गैरव्यवहारांची अनेक प्रकरणे बाहेर काढण्यासाठी माहितीचा अधिकार या कायद्याचा मोठ्या प्रमाणात वापर सुरू झालेला आहे.परंतु सदर कायद्याचा आणखी परिणामकारक वापर व्हावा व त्यातून प्रशासन आधिक पारदर्शी व लोकाभिमूख व्हावे या उद्देशाने माहिती अधिकारांचा वापर करणाऱ्या व करू इच्छिणाऱ्या जागरूक नागरिकांचे परस्परांना मदत व सहकार्य व्हावे व त्यांना वैधानिक मार्गदर्शन आणि सहकार्य मिळावे तसेच प्रशासनातील भ्रष्टाचार चव्हाट्यावर आणण्यासाठी माहिती अधिकार कायदा नेमकेपणे कसा वापरावा ? नेमकी व मुद्देसूद माहिती कशी विचारावी ? कार्यकर्त्यांच्या अनुभवांची परस्परात देवाणघेवाण व्हावी म्हणून आरटीआय कार्यकर्त्यांचे महाराष्ट्रव्यापी व्यासपीठ असणे गरजेचे झाले आहे.तसेच माहिती अधिकार कार्यकर्त्यावर गंभीर हल्ले करणे तसेच धमक्या देणे असे प्रकार खूपच वाढले आहेत.या पासून कार्यकर्त्यांना सरंक्षण मिळावे तसेच त्यांना राज्याच्या राजधानी पासून ते आपल्या गावापर्यंत पाठबळ मिळावे म्हणून कार्यकर्त्यांच्या एकजूटीची खूपच आवश्यकता आहे. यासाठी तसेच महाराष्ट्रभरातील अनेक कार्यकर्त्यांशी व्यापक बोलणी व चर्चा केल्यानंतर आम्ही महाराष्ट्रव्यापी व सर्व राजकीय प्रवाहापासून अलिप्त व शुद्ध सामाजिक असा **माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ, महाराष्ट्र** स्थापन केला असून या अंकामध्ये यांसबंधीचा एक सभासद फॉर्म दिला आहे.या महासंघाचे जिल्हा तालुका व शहर स्तरावरील पदाधिकारी म्हणून काम करण्यास इच्छूक असणारे माहिती अधिकार कार्यकर्ते, दक्ष व जागरूक नागरिकांनी हा फॉर्म सविस्तर भरून **माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ** प्लॉट नं.ई-९६, सेक्टर- १२ खारघर,नवी मुंबई-४१०२१० या पत्यावर पाठवावा.

लबाडी ही एक आखूड चादर आहे.ही तोंडावर घेतल्यास पाय उघडे पडतात.

जनजागृती! संरक्षण!! संघर्ष !!!

# माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ, महाराष्ट्र

आरटीआय कार्यकर्त्यांची राज्यव्यापी एकजूट !

संपर्क : प्लॉट नं.ई-९६, सेक्टर- १२ खारघर,नवी मुंबई-४१०२१०

## सभासद फार्म

फोटो

नाव : -----------------------------------------------------

पत्ता :----------------------------------------------------

------------------------------ पीनकोड

मोबाईल :

ई मेल :--------------------

शिक्षण : ----------------------- जन्मदिनांक ------------------------------

व्यवसाय :--------------------- येणाऱ्या भाषा: ------------------------------

माहिती अधिकार कार्य व समाजकार्याचा अनुभूव किती वर्षाचा आहे: ---------------------

इतर कोणत्या राजकीय किंवा सामाजिक संस्थेशी संबधीत आहात : ---------------------

माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघाचे पदाधिकारी म्हणून कोणत्या स्तरावर कार्य करण्यास इच्छूक आहात ? :गाव/ शहर/ तालूका / जिल्हा /------------------------------------

मी गंभीरपूर्वक व विवेकपूर्वक निवेदन करतो की मला आपण माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघाचा वार्षिक सभासद करून घ्यावे.मी सभासद फी व नागरिक अधिकार मासिकाची वार्षिक वर्गणी असे एकत्रीत ३०० रूपये भरीत आहे.सभासद ओळखपत्र व मासिकाचे अंक मला माझ्या पत्यावर पाठवून द्यावे.मी भारतीय संविधानाने घालून दिलेल्या कायदेशीर कक्षेत नागरिक म्हणून दिलेल्या अधिकारक्षेत्रातच कार्य करीन. आपला विस्वासू

दिनांक : / /

ठिकाण : ------------- सही

सभासद कोड नंबर

## कार्यालयीन उपयोगासाठी

मासिक वर्गणी नंबर

- ओळखपत्र मुदत आरंभ दिनांक / / २०१२ मुदत समाप्तीचा दिनांक / / २०१३
- पदाधिकारी म्हणून नियुक्ती झाली ते पद ------------------------------ आयडी पाठविलाचा दिनांक /पोस्ट / कुरिअर
- मासिकांचा अंक पाठविण्यास सुरूवात केलेला महिना व वर्ष ------------- / २०१२
- मासिक वर्गणी व सभासद फीस रूपये मनिऑर्डर / बँक अकाऊंट / डी.डी./चेक ने दि. / / २०१ रोजी जमा झाली
- आपण वेबसाईट rtimahasangh.weebly.com वरूनही ऑनलाईन फार्म भरू शकता

समुद्रातील तुफानापेक्षा मनातील वादळे अधिक भयानक असतात.

# RTI कायदा धाब्यावर ठेवून बसले, खूशाल थंड
# ४५९ सरकारी अधिकाऱ्यांना ४४ लाख रुपयांचा दंड

माहिती अधिकार अधिनियम २००५ अन्वये राज्यभरातून लाखो अर्ज केले जातात.अनेक जनमाहिती अधिकारी अर्ज आला की माहिती देण्याच्या कामाला लागतात.परंतु काही वेळा जनमाहिती अधिकारी माहिती देण्याचे टाळतात.जी माहिती दिल्याने सरकारी पातळीवरील भ्रष्टाचार उघड होईल व आपण आणि आपले सगळे कार्यालय अडचणीत येईल आपले पितळ उघड होईल या हेतूने किंवा अशा भीतीने अनेकदा माहिती दिली जात नाही. वरून पुन्हा आरटीआय कार्यकर्ते ब्लॅकमेलिंग करतात म्हणून आवई मारायची.ही सरकारी अधिकाऱ्यांची मखमालिशी आता सर्वांनाच माहित झाली आहे.माहितीच्या अधिकारात माहिती मागणाऱ्या अर्जदाराला त्याने मागीतलेली सर्व माहिती विनाविलंब देण्यची तत्परता दाखविली तर ब्लॅकमेलिंगचा प्रश्नच येत नाही.सरकारी अधिकारी अगोरदर काहीतरी ब्लॅक करतात मग कोणीतरी चोरावर मोर होवून त्यांना ब्लॅकमेल करण्याची शक्यता वाढते.सरकारी अधिकाऱ्यांनी जर काहीच ब्लॅक केले नाही तर त्यांना ब्लॅकमेलिंग करण्याचा प्रश्नच येत नाही.

परतु जेव्हा माहिती मागणारा अमिश दाखवून ही बळी पडत नाही.आपल्याला अर्ज केल्याप्रमाणे माहिती मिळालीच पाहिजे म्हणून ठाम राहतो तेव्हा तेव्हा जनमाहिती अधिकारी वरिष्ठांशी संगनमत करून त्याला माहिती देण्याचे टाळतात.मग पहिले अपिल होते.सर्वसाधारण अनुभव असा आहे की पहिल्या अपिलामध्ये सुनावणी घेणारा त्याच कार्यालयातील वरिष्ठ असतो.शेवटी त्या कार्यालयात झालेल्या प्रत्येक गैरप्रकारस तोच जबाबदार असतो.जेव्हा आरोपीच न्यायधिश असतो तेव्हा चोरीचा छडा लागणार कसा ? पहिले अपिल थातूर मातूर कारणे सांगून गुंडाळले जाते.अर्जदाराला नाविलाजाने दुसरे अपिल करावे लागते.दुसऱ्या अपिलातही अनेक वेळा अर्जदारावर अन्याय होतो.परतु माहिती अधिकार कायद्याचा उपमर्द करणाऱ्या जनमाहिती अधिकाऱ्यांना दुसऱ्या अपिलात दंडाचा व विभागीय चौकशीचा हिसकाा बसतो. २०११ च्या वार्षिक अहवालाप्रमाणे सन २०११ या वर्षात ४५९ जनमाहिती अधिकाऱ्यांना माहिती न दिल्याने एकूण ४४,४२,७५० रूपयांचा अर्थिक दंडांचा फटका बसला आहे.

| विवरणपत्र क्रमांक-५<br>दिनांक ०१.०१.२०११ ते ३१.१२.२०११ या कालावधीतील शास्ती व विभागीय चौकशी बाबतचा एकत्रित गोषवारा | | | | |
|---|---|---|---|---|
| अ . क्र. | विभागाचे नाव | शास्ती केलेल्या प्रकरणांची संख्या [कलम २० (१)] | शास्तीची एकूण रक्कम (रुपये) | विभागीय चौकशीची शिफारस केलेल्या प्रकरणांची संख्या [कलम २० (२)] |
| १ | मुंबई (मुख्यालय) | १४ | १,८७,७५०/- | २८ |
| २ | बृहन्मुंबई | ३ | २५,०००/- | ३९ |
| ३ | कोंकण | १०४ | २,२९,४००/- | ० |
| ४ | पुणे | ५१ | ७,१६,३५०/- | १ |
| ५ | औरंगाबाद | ८२ | १५,५५,००० /- | ४४ |
| ६ | नागपूर | ८९ | ६,०३,००० /- | ३३ |
| ७ | अमरावती | ४४ | १,६२,०००/- | २६३ |
| ८ | नाशिक | ७२ | ९,६४,२५०/- | ८ |
| | **एकूण** | **४५९** | **४४,४२,७५०/-** | **४१६** |

मनुष्य हा मोठा विचित्र प्राणी आहे तो सुख घटाघटा पितो अन दु:ख चघळीत बसतो.

# टोल नाक्यावरील कंत्राटदारांकडून होणारी जनतेची लूट थांबवा. टोलनाक्याची माहिती मागवा.ती सार्वजनिक करा.

माहितीचा अधिकार कायदा २००५ -कलम ३ अन्वये अर्ज

(जोडपत्र " अ "नियम ३ नुसार)

प्रति,जन माहिती आधिकारी

सां.बांधकाम विभाग /रस्ते विकास महामंडळ

१) अर्जदाराचे नांव ------------------------------------------

२) अर्जदाराचा पूर्ण पत्ता::------------------------------------------

३) माहितीचा विषय - ---------------- या रस्यावरील / पूलावरील टोल संदर्भात माहिती.

४)आवश्यक असलेल्या माहितीचा तपशील व कालावधी (टोल सुरू होण्याचे ठरले तेव्हापासून आजपर्यंत)

१) -------------------- या रस्त्यावर/ पूलावर टोल नाका तसेच टोल आकारणी सुरू करताना रहदारीचा((vehicle flow))अभ्यास केला आहे काय ? असल्यास केव्हा केला ? सदर रहदारी अभ्यास /रहदारी सव्हेक्षण अभ्यास अहवालाची एक सत्यप्रत द्यावी. हा अहवाल कोणत्या सक्षम अधिकाऱ्यांनी केला त्याचे पदनाम व हुद्दा द्यावा.

२) टोल चे दर काय आहेत ? प्रत्येक प्रकारच्या वाहनागणिक तपशील द्यावा.तसेच हे दर ठरवताना काय वस्तूस्थिती विचारात घेतली आणि हे दर कोणत्या आधारावर घेतले त्यासंबंधीची कागदपत्रे उपलब्ध करून द्यावीत.

३) टोल किती वर्षासाठी घ्यावा याचा निर्णय घेताना काय वस्तूस्थिती विचारात घेतली त्यासंबंधी कागदपत्राच्या प्रति मिळाव्यात.

४) या टोल आकारणी संदर्भात जी टेंडर नोटीस प्रसिद्ध करण्यात आली तसेच कोटेशनच्या आलेल्या निविदाच्या प्रती तसेच तुलनात्मक तक्ता द्यावा.

६) टोल चा ठेका देताना काढलेल्या वर्क आर्डर ची प्रत द्यावी.

७) टोल कधी सुरू झाला ?टोल आकारणी दरात किती वेळा व किती रूपयांचा बदल झाला ? सुरू झाल्यापासून आज पर्यंत किती रूपये वसूल झाले ? किती रूपये वसूल होणे अपेक्षित आहे ? टोल किती कालावधीच्या मुदतीपर्यंत सुरू ठेवण्याचे ठरले आहे ? केव्हा वसूली बंद कधी होणार याची तारीख किंवा कलावधी ठरला आहे काय ? असल्यास तपशील द्यावा.

८) टोल वसूली करताना वाहनधारकांना पावती न देता वाहने सोडून देणे, बोगस पावत्या देणे, किवा टोलवसूलीमध्ये शासनाची भ्रष्ट मार्गाने फसवणूक करणे या बाबीवर नियंत्रण ठेवण्यासाठी आपली यंत्रना कशा प्रकारे कार्य करते ? या वर नियंत्रण ठेवणाऱ्या सक्षम अधिकाऱ्यांचा पदनाम व हुद्दा द्यावा.

५) माहिती टपालाने हवी की व्यक्तिश: माहिती मी व्यक्तीश: घेऊन जाईन./ टपालाने पाठवावी.

६) अर्जदार दारिद्र्य रेषेखालील नाही (१० रूपयाचा कोर्ट फी स्टॅम्प जोडला आहे)

अर्जदाराची सही

ठिकाण :--------------

दिनांक : - ---------------- नाव (----------------)

# माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ,महाराष्ट्र

## स्वराज आंदोलन नागरिक अधिकार

### आता इंटरनेटवर ही उपलब्ध !


### rtimahasangh.weebly.com

**नागरिक अधिकार मासिकांचे जूने अंक**
**माहिती अधिकार महासंघाच्या सभासदांची यादी**
**नव्या घटना व घडामोडीची आवश्यक ती माहिती**
**ऑनलाईन सभासद नोंदविण्यांची सोय**

व्यवस्था परिवर्तनाचा नवा एल्गार
सुभाष बसवेकर यांचे नवे क्रांतीकार पुस्तक

**ग्रामसभेला व्यापक अधिकार द्या.**
**देशाच्या राष्ट्रीय उत्पन्नातील ५० वाटा**
**ग्रामसभा व वार्डसभा यांना द्या**
**लोकप्रतिनिधींचे विशेषाधिकार कमी करा**
**संपूर्ण शासकीय व प्रशासकीय व्यवस्था ऑनलाईन करा**

प्रसिद्ध झाले !
किंमत २० रूपये
कार्यकर्त्यांनी एकत्रीत किमान२०० रूपये
भरून दहा पुस्तके मागविल्यास
पोष्टाने पाठविणे किफायतशीर ठरेल.
मो.९२२३५१६९२०




मोती होवून सुवर्णांच्या संगतीत राहण्यापेक्षा दवबिंदू होवून चातकाची तहान भागविण्यात अधिक सार्थकता आहे.

# मेरे सपनों को जानने का हक रे !



मेरे सपनों को जानने का हक रे
क्यू सदियों से टूट रहे हैं ?
इनको सजने का काम नही ..

मेरे हाथो को जानने का हक रे
क्यों बरसों से खाली पडे है ?
इन्हे आज भी काम नाही ..

मेरे पैरों को यह जानने का हक रे
क्यों गाँव-गाँव चलना पडा रे
क्यो बस की निशान नही ...

मेरी बुढी माँ को जानने का हक रे
क्यों गोली नही,सुई दवाखाने
पट्टी टाकने का सामान नही ...

मेरी खेती को यह जानने का हक रे
क्यों बाँध बने हैं बडे -बडे
तो भी फसलों में जान नही ...

मेरे जंगलों को जानने का हक रे
कहा डालीयॉ वोह पत्ते,टेल मिट्टी
क्यों झरनों का नाम नही ..

मेरे नदियों का यह जानने का हक रे
क्यों जहर मिलाँए कारखाने
क्यो नदियाँ में जान नही ..

ज मेरे गाँवो को यह जानने का हक रे
क्यों बिजली न सडके न पानी
क्यों खूली राशन की दुकान नही ..

मेरे वोंटो को यह जानने का हक रे
क्यों एक दिन बडे -बडे वादे
फिर पाँच साल काम नही

मेरे राम को यह जानने का हक रे
मेरे रहमान को यह जानने का हक रे
क्यो खून बहा रहे सडकों मे
क्या हम सब इन्सान नही ?

मेरी जिंदगी को यह जानने का हक रे
अब हक के बीना भी क्या जीना
यह जीने के समान नही ....

स्नेहाचा एक कटाक्ष दु:खी हृदयाला कुबेराच्या संपत्तीपेक्षा अधिक मोल्यवान असतो.

**कायद्याची ओळख**

# भारत मानक ब्यूरो अधिनियम १९८६

## काय आहे ? खरा मार्क कसा ओळखावा.

आपण बाजारात कोणतीही वस्तू आणायला जातो. वस्तू घेताना आपण प्रथम सदर वस्तू ISI मार्क ची आहे काय हे पाहतो. ISI (आयएसआय ) म्हणजे गुणवत्ता असणारच असे आपण गृहित धरतो.बाजारात असंख्य प्रकारच्या हजारो वस्तू असतात. पंखा इस्त्री मिक्सर अशा इलेक्ट्रीकल्स आणि काही इलेक्ट्रॉनिक्स वस्तू मोटारीचे टायर्स, वनस्पती तूप, पिण्याचे पाणी आणि टॉयलेट सोप पर्यंत हजारो ISI चिन्हांकित वस्तूनी बाजार गच्च भरलेला दिसतो. ISI म्हटले की आपण डोळे झाकून सदर वस्तू गुणवत्ता पूर्ण आहेच असा विस्वास ठेवतो.असा विस्वास ठेवताना सावधान ! हाच आंधळा विस्वास आपली फसवणूक ही करू शकतो.कारण बोगस आणि मान्यता न घेता ISI मार्क असे अनाधिकृतपणे प्रिंट केलेल्या वस्तू बाजारात भरपूर असतात.नेमक्या त्याच आपण घेतल्या तर आपली फसवणूक होवू शकते. त्यासाठी ISI ही प्रणाली काय आहे हे आपण अभ्यासून घेतले पाहिजे.

भारत मानक ब्यूरो नावाची केंद्र शासनाची वस्तूंच्या गुणवत्ता प्रणाली ठरविणारी संस्था आहे.ही संस्था कृषी अन्न व ग्राहक सेवा




खऱ्या ISI चिन्हांची नमूना प्रतिकृती


मंत्रालयाच्या अधिन चालते.ही संस्था भारतीय मानक ब्यूरो अधिनियम १९८६ या कायद्यानुसार आपले काम करते.

ग्राहकांना लागणाऱ्या विविध वस्तूंचे उत्पादक आपल्या उत्पादनांवर ISI चिन्हांकित करण्यासाठी भारत मानक ब्यूरो कडे रितसर शुल्कासह अर्ज करतात.भारत मानक ब्यूरो यांच्याकडे विविध क्षेत्रातील गुणवत्ता प्रमाणीकरण तज्ञ असतात.गुणवत्ता तपासण्यासाठी विविध प्रकारच्या प्रयोगशाळा असतात.तेथील तज्ञ उत्पादकांच्या वस्तूवर विविध

# खरा ISI मार्क कसा ओळखावा.

चाचण्या घेतात ूजेव्हा उत्पादन प्रमाणीत गुणवत्तेचे निर्माण होत आहे असे आढळून आल्यानंतर अर्जदार कंपनीच्या उत्पादनावर ISIमार्क चिन्हांकित करण्यासाठी परवानगी देण्यात येते. चिन्हाबरोबर प्रत्येक उत्पादनांचा एक नोंदणी क्रमांकही असतो जो चिन्हाखाली प्रिंट केलेला असतो.एकदा ISI मार्क घेतला की काम संपले असे नव्हे तर निर्माण झालेली प्रत्येक वस्तू विशिष्ठ गुणवत्तेचीच बनविली जाते की नाही यांचे निरिक्षण सतत भारत मानक ब्यूरो चे निरिक्षक अधिकारी करीत राहतात.तसेच जे उत्पादक भारत मानक ब्यूरो च्या परवानगी शिवाय त्यांच्या उत्पादनावर जर ISI चिन्ह छापत असतील तर अशा उत्पादकांच्या कारखान्यावर छाडी टाकून त्यांचा माल जप्त केला जातो.तसेच उत्पादकांच्या विरोधात न्यायालयत खटला दाखल केला जातो.तसेच विनापरवाना ISI किंवा सदृस्य चिन्ह वापरल्याबद्दल उत्पादक व्यक्तीला तसेच कंपनीला आर्थिक दंड व व्यावसाय संचालकांना कारावास अशी शिक्षेची तरतूद भारत मानक ब्यूरो अधिनियम १९८६ मध्ये करण्यात आलेली आहे आहे. ISI हे प्रमाणित चिन्ह .त्यांचा आकार ४:३ असा




खोटे किंवा डूप्लीकेट आएसआय मार्क थोडे निरिक्षण करताच सहज ओळखू येतात.

असतो.या चिन्हाखाली त्या त्या उत्पादनाचा नोंदणी क्रमांक दिलेला असतो.हे चिन्ह हे विशिष्ट आकाराचे प्रमाण व त्याखालील नोंदणी नंबर

पाहूनच खरेदी करावी. हे चिन्ह भारत मानक ब्यूरो ने प्रमाणीत केलेले आहे की नाही.याचा तपास या बेवसाईटवर जावून करता येतो.जर चिन्हाखालील क्रमांकसह प्रमाणीकरण झालेले नाही असे आढळून आले तर ते आयएसआय

# खरा ISI मार्क कसा ओळखावा ?

**चिन्ह नकली किंवा बोगस असल्याची आपणाकडे माहिती असेल तर आपण यांच्याकडे लेखी पत्राने तक्रार दाखल करू शकता**

निर्देशक प्रवर्तनालय,
भारत मानक ब्यूरो
तिसरा मजला मानकालय -९
बहादूर शहा जफर मार्ग
नवी दिल्ली -२
फॅक्स नंबर 011 23232636
011 23230922



**तक्रार करण्यासाठी एक फोन करा.**

**011 23233650**

**011 23232636.**

चिन्ह अगदी हुबेहुब दिसत असले तरी बोगस आहे असे समाजावे

काही बोगस उत्पादक आपल्या उत्पादनावर मार्क्स ला मिळते जूळते चिन्ह छापून ग्राहकांची फसवणूक करतात.अशी चिन्हे थोडेसे सुक्ष्म निरिक्षण केले की लगेच लक्षात येतात.तेव्हा वस्तू वरील चिन्ह नीट पाहून घ्यावे.

बोगस किंवा खोटे चिन्ह आहे.असे आढळल्यास किंवा तसा गंभीर संशय आल्यास आपण भारत मानक ब्यूरो ना पत्राने लिहून कळूव शकता पत्ता कळविण्यासाठी पत्ता पुढील प्रमाणे आहे

निर्देशक प्रवर्तनालय भारत मानक ब्यूरो तिसरा मजला मानकालय -९ बहादूर शहा जफर मार्ग नवी दिल्ली -२ फोन नंबर 011 23233650 011 23232636

तसेच फॅक्स नंबर वर कळवू शकता तसेच ई-मेल वर

E-mail : enf@bis.org.in तक्रार करू शकता.किंवा फोन करून आपली तक्रार करू शकता.तक्रारदाराचे नाव गुप्त ठेवले जाते.अशा तक्रारीची दखल घेवून उत्पादकांच्या कारखान्यावर छापा टाकून

समोर आलेली समस्या योग्य शब्दात मांडता आली म्हणजेच ५० टक्के यश मिळाले असे समजावे

# पूरवठा विभाग व इंधनविक्रेते यांची माहिती मागवा
# इंधनभेसळ उघड करा.सार्वजनिक करा.

केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अनुसार अर्ज
(जोडपत्र " अ "नियम ३ नुसार)

प्रति,
जनमाहिती अधिकारी
तहसील कार्यालय
----------------------------

१) अर्जदाराचे नांव - --------------------------------------------------

२) अर्जदाराचा पूर्ण पत्ता: ----------------------------------------------

३) माहितीचा विषय - ------- तहसील कार्यालयातील पूरवठा विभागाकडून खालील माहिती मिळणेबाबत

४)आवश्यक असलेल्या माहितीचा तपशील व कालावधी (पुढीलप्रमाणे)

१) आपल्या कार्यालय अधिकार क्षेत्रात किती पेट्रालपंप आहेत ? या सर्व पेट्रालपंपाच्या ठिकाणांचे पत्ते, त्यांच्या चालकांची नावे व पत्ते ,आईल कंपन्यांची नावे तसेच प्रत्येक पेट्रालपंपाची इंधन प्रकारानुसार जास्तीतजास्त साठवण क्षमता? तसेच या पेट्रालपंपाचे आपल्या कार्यालयातील सक्षम अधिकारी यांनी सन २००९ आणि २०१० मध्ये केलेले तपासणी रिपोर्ट, त्यांच्या कार्यपद्धतीबाबत नोंदविलेले शेरे, अक्षेप आणि टिप्पणी आणि मालाची आवक -विक्री झालेल्या नोंदी यांच्या सत्यप्रती उपलब्ध करून द्याव्यात.

२) आपल्या कार्यालय अधिकार क्षेत्रात किती ठोक केरोसिन वितरक एजन्सीत आहेत ? या सर्व केरोसिन वितरक एजन्सीच्या कार्यालय आणि गोदामाच्या ठिकाणांचे पत्ते, त्यांच्या चालकांची नावे व पत्ते एजन्सीची जास्तीतजास्त साठवण क्षमता आदी माहिती द्यावी.कार्यालयातील सक्षम अधिकारी यांनी सन २००९ आणि २०१० मध्ये केलेले तपासणी रिपोर्ट, त्यांच्या कार्यपद्धतीबाबत नोंदविलेले शेरे, अक्षेप आणि टिप्पणी तसेच गोदामातून मालाची आवक जावक झालेल्या नोंदी यांच्या सत्यप्रती उपलब्ध करून द्याव्यात.

३) सार्वजनिक पूरवठा विभागाकडून नियुक्त केलेले किरकोळ रॉकेल / केरोसिन विक्रेत्यांच्या दूकानांची यादी २०१० अखेरपर्यंतची ग्राहकसंख्या घरगुती / व्यवसायिक / आपल्या कार्यालयातील सक्षम अधिकारी यांनी सन २००९ आणि २०१० मध्ये केलेले तपासणी रिपोर्ट, मालाच्या आवक जावक रजिस्टर मधील नोंदी, कार्यपद्धतीबाबत नोंदविलेले शेरे, अक्षेप आणि टिप्पणी यांच्या सत्यप्रती उपलब्ध करून द्याव्यात.

५) माहिती टपालाने हवी की व्यक्तिशः माहिती मी व्यक्तीशः घेऊन जाईन.

६) अर्जदार दारिद्र्य रेषेखालील नाही (१० रूपयाचा कोर्ट फी स्टॅम्प जोडला आहे)

अर्जदाराची सही

ठिकाण :-----------

दिनांक : -------------

(---------------------)

मो ------------

शेवटचे पान ..

प्रेरणा

# ते नावं बदलाताहेत

ते नावं बदलाताहेत
शहरांची,घरांची,विद्यापिठांची,विमानतळांची
ही लागन वाढत जाईल
ते बदलतील नाव शब्दांची

ते,भूकेला अन्न,ताहनेला पाणी म्हणतील,
माणसांना ग्राहक,मॉल ला मंदिर -मस्जीद म्हणतील
घरांना वेटिंगरूम,पोरांना इन्व्हेस्टमेंट म्हणतील,

आत्महत्त्येला मुक्ती,वनवासाला संन्यास म्हणतील
गांधीला गोडसे,शिवीला ओवी आणि पुस्तकांना बॉम्ब म्हणतील,

चला आपणही त्यांच्या आरत्या ओवाळू
त्यांची पूजा करू,त्यांना साष्टांग नमस्कार घालू
आधी या शब्दांची नाव,जरा आपणही बदलून घेऊ

- कविता महाजन

प्रति,

पोष्ट परवाना. No.G/NMD/128/2012-14

पाठविणार

पत्ता: **नागरिक अधिकार**
प्लाट नं. ई-१६, सेक्टर -१२ खारघर,
नवी मुंबई ४१०२१० महाराष्ट्र
मो ९२२३५४१६९२०

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक आणि संपादक सुभाष महादेव बसवेकर यांनी स्वराज प्रिंट प्रोसेस कार्यालय, सेक्टर-१०, कोपरा ब्रीजजवळ, खारघर ता.पनवेल जि.रायगड ४१० २१० येथे मुद्रीत करून, अे विंग फ्लॅट-०३ साईसदन सोसायटी प्लॉट नं.५६ सेक्टर-१९ खारघर ता.पनवेल जि.रायगड ४१० २१०येथे प्रकाशीत केले.
रजि नं. MAHMAR/2011/40781